VOL- VII ISSUE- IX SEPTEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# नांदेड शहराअंतर्गत शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची पर्यावरण शिक्षण याविषयी जागरूकता – एक अभ्यास

**डॉ. के.एच. कुलकर्णी**
इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय (एम.एड.)
विष्णुपुरी नांदेड

## १.१ प्रस्तावना :-

मनुष्य हा पर्यावरणाचे एक अविभाज्य अंग आहे. वाढती लोकसंख्या, वाढते प्रदुषण आणि वाढते औद्योगिकरण यामुळे अलीकडील काळात पर्यावरण विषयक प्रश्नाने गंभीर स्वरुप केले आहे. पर्यावरण जागरूकतेची गरज भारतालाच नव्हे तर सर्व राष्ट्राला जाणवू लागली आहे, हे सत्य असून राहिलेले नाही. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने स्टॉकहोम येथे १९७२ मध्ये सर्व प्रथम जागतिक स्तरावर पर्यावरण आयोजन केले. या परिषदेने पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले. भारताने सुध्दा या परिषदेत भाग घेतला होता.

पर्यावरण शिक्षणाची जाणीव जागरूकतेची आस्था वाढावी म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार विद्यापीठातून विविध विद्याशाखात पदवी स्तरावर पर्यावरणाशास्त्र हा विषय इ.स.२००४ ते २००५ पासून अनिवार्य केला आहे.

## १.२ समस्याविधान :-

नांदेड शहरातील शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची पर्यावरण शिक्षण याविषयी जागरूकता – एक अभ्यास.

## १.३ पारिभाषिक व्याख्या :-

१) नांदेड – महाराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद विभागातील नांदेड जिल्हयाचे मुख्य महानगर.

२) शिक्षण – शिक्षण म्हणजे व्यक्तिच्या अंतर्गत शक्तीचा विकास बाहयतः लावलेली वृध्दी नव्हे. (जॉन जॅक्स रूसो शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका डॉ. न.रा.पारसनिस पृष्ठ क्र. २)

३) **शिक्षण महाविद्यालय** :- पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवसायासाठी चालविलेले महाविद्यालय म्हणजेच शिक्षण महाविद्यालय होय.

४) **प्रशिक्षणार्थी** :- ज्याला प्रशिक्षण घ्यावयाचे आहे तो विद्यार्थी म्हणजेच प्रशिक्षणार्थी होय.

५) **पर्यावरण** :- पृथ्वीवरील ठराविक विभागाषी संबंधित असलेली परिसरातील स्थिती म्हणजे पर्यावरण.(उपयोजित पर्यावरण शिक्षण डॉ. शारदा शेवतेकर, पृष्ठ क्र. ११)

६) **पर्यावरण शिक्षण** :- विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयी ज्ञान देवून त्यांच्या अंगी पर्यावरण संवर्धनाविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजे पर्यावरण शिक्षण होय. (पर्यावरण शिक्षण डॉ.के.एम. भांडारकर, पृष्ठ क्र.२६)

७) **जागरूकता** :- वैयक्तिक तसेच सामुदायिकपणे लोकांच्या मनामध्ये पर्यावरण समस्येविषयी जाणीव निर्माण करणे म्हणजे जागरूकता होय. (उपयोजित पर्यावरण शिक्षण डॉ. शारदा शेवतेकर, पृष्ठ क्र. २०६)

## १.४ संशोधन व्याख्या :-

१) **नांदेड** – मराठवाडयातील एक शहर, गोदावरी नदीच्या काठी वसलेले एक शहर व शिखांचे

शेवटचे व दहावे गुरू, गुरू गोबिंदसिंघजी यांची समाधी असलेले शहर म्हणजे नांदेड होय.

२) **शिक्षण** :- व्यक्तिच्या वर्तनाचा इष्ट दिशेने घडून येणारा बदल म्हणजे अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था.

३) **महाविद्यालय** :- विद्यापीठाशी संलग्न असणारे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था.

४) **शिक्षण महाविद्यालय** :- ज्या महाविद्यालयात शिक्षण अभ्यासक्रम या पदवीचा अभ्यास केला जातो, त्या महाविद्यालयाला शिक्षण महाविद्यालय असे म्हणतात.

५) **प्रशिक्षणार्थी** :- अध्यापक महाविद्यालयातील अध्यापक शास्त्र पदविकेअंतर्गत व पदवीचे प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी.

६) **पर्यावरण** :- पृथ्वीवरील विशिष्ट भागांशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

७) **पर्यावरण शिक्षण** :- पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी जे शिक्षण दिले जाते ते शिक्षण म्हणजे पर्यावरण शिक्षण होय.

८) **जागरूकता** :- एखाद्या समस्येविषयी लोकांमध्ये सुधारणा घडवून आणणे म्हणजेच जागरूकता होय.

**१.५ संशोधन समस्यांची गरज व महत्त्व :-**

प्रशिक्षणार्थी हा भविष्यामध्ये शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांना शिकविणार आहे. शालेय स्तरावर पाठयघटकातील आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोंहचविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांनाा संबंधित विषयासंबंधीचे मूळ जाणून घेणे आणि पर्यावरण शिक्षणाविषयी त्यांच्यात जाणीव-जागृती निर्माण करणे. त्याचप्रमाणे प्रशिक्षणार्थ्यांना हया विषयाबद्दल अभिरूची आहे की नाही हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

आज पर्यावरणाविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे ही फक्त सामाजिक स्तरावर आवश्यक नसुन राष्ट्रीय स्तरावर देखील तेवढीच आवश्यक आहे. सध्याच्या शिक्षकाला पर्यावरण शिक्षणाबद्दल जागृत करणे काळाची गरज आहे. कारण वाढते प्रदूषण, वाढती लोकसंख्या आणि वाढते औद्योगिकरण, असंख्य प्रमाणात होणारी जंगलतोड व निर्माण करण्यात आलेले क्रॉक्रेटचे जंगल यासाठी शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पर्यावरण शिक्षण व विषयाबद्दल जागृत करणे आवश्यक व महत्त्वाचे आहे.

**१.६ व्याप्ती :-**

अ) **कालावधी व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती सन २०१६ इतकी आहे.

ब) **नमुना व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधनासाठी ३०० प्रशिक्षणार्थ्यांपैकी ३५ प्रशिक्षणार्थी नमुना म्हणून निवडले आहेत.

क) **स्थळ व्याप्ती** :- प्रस्तुत संशोधन हे नांदेड शहरातील शिक्षण महाविद्यालयापूरतेच मर्यादित आहेत.

**१.७ मर्यादा :-**

अ) **कालावधी मर्यादा** :- प्रस्तुत संशोधन सन २०१६ पूरते मर्यादित आहे.

ब) **भौगोलिक मर्यादा** :- प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष फक्त नांदेड शहरातील शिक्षण महाविद्यालयापूरतेच मर्यादित आहेत.

क) **विषय मर्यादा** :- प्रस्तुत संशोधनात फक्त नांदेड शहराअंतर्गत शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी यांचा पर्यावरण शिक्षण हया विषयापुरतेच मर्यादित आहे व त्यात केवळ अध्ययन निष्पत्तीचाच विचार केला आहे. इतर गोष्टीचा विचार केला नाही.

**१.८ संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पर्यावरण शिक्षणाची संकल्पना माहित आहे काय हे जाणून घेणे.

२) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पर्यावरण शिक्षण हया विषयाबद्दल येणाऱ्या अडचणी जाणून घेणे.
३) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना शिक्षण या विषयात आवड आहे काय हे जाणून घेणे.
४) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पर्यावरण विषयक कोणते उपक्रम राबविले जातात हे माहिती करून घेणे.

**१.९ परिकल्पना :-**

१) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी पर्यावरण शिक्षण ही संकल्पना जाणतात.
२) शिक्षण महाविद्यालयामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांकडून विविध उपक्रम राबविले जातात.
३) शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पर्यावरण शिक्षण हया विषयात आवड आहे.

**१.१० गृहितके :-**

१) पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी किंवा टाळण्यासाठी पर्यावरणशास्त्र हा विषय अभ्यासक्रमात ठेवला आहे.

**१.११ जनसंख्या :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड शहराअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ अंतर्गत एकूण तीन शिक्षण महाविद्यालये येतात. या शिक्षण महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षण हा विषय घेणारे प्रशिक्षणार्थी ही संशोधिकेची जनसंख्या आहे. नांदेड शहरातर्गंत एकुण तीन शिक्षण महाविद्यालये असून प्रशिक्षणार्थ्यांची संख्या ३०० आहे. जसंख्येत सर्व घटकांचा अंतर्भाव आहे.

**१.१२ न्यादर्श :-**

संशोधकाने नांदेड शहरातंर्गत तीन शिक्षण महाविद्यालयांपैकी दोन शिक्षण महाविद्यालयाचा न्यादर्श म्हणून वापर केला आहे. न्यादर्शाची एकूण प्रशिक्षणार्थ्याची संख्या ३५ एवढी घेतली आहे. ही सुगम यादृच्छिक नमुना निवड या पध्दतीने करण्यात आली आहे. संशोधन समस्येच्या उद्दिष्टांचा अभ्यास करण्यासाठी आधार सामग्री प्राप्त करता येईल. ह्या दृष्टीने न्यादशांची निवड करण्यात आलेली आहे.

**१.१३ संशोधन पध्दती :-** प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**१.१४ संशोधनाची साधने :-** प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

**१.१५ सांख्यिकिय परिमाणे :-** प्रस्तुत संशोधनासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय परिमाणाचा उपयोग केला आहे.

**१.१६ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

प्राप्त गुणांकावरून माहितीचे विश्लेषण करण्यात आलेत्र त्यासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय परिमाणाचा वापर करण्यात आला व त्यावरून संशोधकाने निष्कर्ष काढले.

**१.१७ संशोधन निष्कर्ष :-**

१) बहुतांश प्रशिक्षणार्थ्यांच्या मते मानव आणि पर्यावरण यांचा दैनंदिन जीवनाशी अत्यंत जवळचा संबंध आहे. यावरून आपणास असे म्हणता येईल की, मानव आणि पर्यावरण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
२) पर्यावरण शिक्षण या संकल्पनेचा उदय सामाजिक आणि राष्ट्रीय गरजांमधून झाला आहे. त्यामुळे हा प्रश्न सर्वच पातळीवर अतिशय महत्त्वाचा वाटतो.
३) पर्यावरणात सजीव, निर्जीव व मानवनिर्मिती घटकांचा समावेश आहे, हे जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थ्यांना माहित आहे.
४) पर्यावरणशास्त्र हा विषय निवडतांना ८३ टक्के प्रशिक्षणार्थ्यांना कोणत्याही अडचणी निर्माण झाल्या नाहीत. जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थ्यांना

VOL- VII ISSUE- IX SEPTEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

कल पर्यावरण शिक्षण हा विषय निवडण्याकडे वाटतो.

५) शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षकाने पर्यावरणशास्त्र या विषयाचे प्रकल्प पध्दतीने अध्यापन केल्यास प्रशिक्षणार्थ्यास हा विषय अधिक चांगल्या प्रकारे आकलन होवू शकतो.

६) शिक्षण महाविद्यालयात ग्रंथालयामध्ये पुरेशा प्रमाणात पुस्तके उपलब्ध करून दिल्याा जात नाहीत.

७) पर्यावरण संरक्षणासाठी प्रशिक्षणार्थी नेहमी जागरूक असतात. परंतु पाहिजे त्या प्रमाणात उपक्रम राबविले जात नाहीत.

८) प्रत्येक शिक्षण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जात नाही. फक्त मोजक्या महाविद्यालयातच करण्यात येतो.

९) शिक्षण महाविद्यालयात पर्यावरण विषयक स्पर्धा पाहिजे त्या प्रमाणात घेतल्या जात नाहीत. अल्पशा प्रमाणात घेतल्या जातात. त्यामुळे प्रशिक्षणर्थ्यांना पर्यावरणाविषयी जास्तीत जास्त माहिती मिळू शकत नाही.

**१.१८ शिफारशी :-**

संशोधकाने संशोधनासाठी निवडलेली समस्या नांदेड शहरातंर्गत येणाऱ्या शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची पर्यावरण शिक्षण या विषयी जागरूकता यासाठी प्रश्नावलीच्या आधारे जी माहिती मिळविली ज्यांच्या विश्लेषणातून प्रशिक्षणार्थ्यांना काही समस्या येत असल्याचे आढळून आले. त्या समस्या दूर करण्यासाठी संशोधकाने पुढील शिफारशी सुचविल्या आहेत.

१) शिक्षण महाविद्यालयात पर्यावरण हा विषय व्याख्यान पध्दतीने अध्यापन न करता प्रकल्प अध्यापन करावे ह्यामधून प्रशिक्षणार्थ्यांची सहकार्याची भावना वाढीस लागून ते अधिक प्रकारे आकलन होवु शकेल.

२) शिक्षण महाविद्यालयात पर्यावरण शिक्षण या विषयाचे पुस्तके जास्तीत जास्त मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दयावेत.

३) पर्यावरण संवर्धनासाठी प्रशिक्षणार्थ्यांकडून विविध उपक्रम जास्तीत जास्त प्रमाणात राबवून घ्यावेत.

४) प्रत्येक शिक्षण महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा करून प्रशिक्षणार्थ्यांना तज्ञ व्यक्तिच्या मार्गदर्शनाची संधी उपलब्ध करून दयावी.

५) शिक्षण महाविद्यालयात पर्यावरण विषयाच्या विविध स्पर्धेचे आयोजन करावे. त्या स्पर्धेतून प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक विकास होवू शकतो.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१) भिंताडे वि.रा. (जून २००४) शैक्षणिक संशोधन पध्दती पुणे, नूतन प्रकाशन.

२) मुळे रा.श. उमाटे वि.तू. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर.

३) शारदा शेवतेकर (२५ डिसेंबर), उपयोजित पर्यावरण शिक्षण, नित्य नूतन प्रकाशन.